**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

**दिनांक :०३ मे,२०१८**

**वाचा** :

१) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३.१०.२०१६

२) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी१०१६/ प्र.क्र. ४७३/ १६/ शिक्षण-२, दिनांक ०९.१२.२०१६

३) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५.०४.२०१७

४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- ईबीसी २०१८/ प्र. क्र. ३८ /तांशि-४, दिनांक १४.०२.२०१८

५) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी १०१८/ प्र.क्र. ४९/ १८/ शिक्षण-२, दिनांक१७.०४.२०१८

परिपत्रक:-

राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न विहीत केलेल्या मर्यादेत आहे अशा विद्यार्थ्यांना काही अटी व शर्तीसह शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपुर्ती करण्याकरीता "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस" संदर्भाधीन क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने, राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक पदवीपुर्व अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा" लाभ

मिळावा या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ वरील शासननिर्णयान्वये पुरक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एमबीबीएस व बीडीएस अभ्यासक्रमांस प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या दरम्यान आहे, अशा विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या रकमेच्या प्रतीपुर्ती ऐवजी शासनाने/सक्षम प्राधिकरणाने संबंधीत अभ्यासक्रमांकरीता विहीत केलेल्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात देण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक ५ वरील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. संदर्भाधीन क्रमांक ३ वरील शासननिर्णयान्वये "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचे" नामकरण "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" असे करण्यात आले आहे. तसेच, सदर योजनेंतर्गत शासनाने/ सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बॅक खात्यावर जमा करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांने संबंधीत महाविद्यालयास अदा करावयाची आहे. त्यामुळे आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम त्यांच्या महाविद्यालयास प्रवेशाच्या वेळी अदा करणे आवश्यक नाही. आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात अनुज्ञेय होणारी शिक्षण शुल्काच्या रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत विद्यार्थ्यांकडे आग्रह धरु नये वा त्याकरीता प्रवेश करण्यास टाळाटाळ करु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळीच शिक्षण शुल्काच्या संपुर्ण रकमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरल्यास वा तशी मागणी केल्यास अशा महाविद्यालयांविरोधात यथायोग्य कारवाई करण्यात येईल.

३. "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काच्या शिष्यवृत्ती रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत शिक्षण संस्थांनी आग्रह धरु नये असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता संदर्भाधीन क्रमांक ४ वरील शासन

परिपत्रकान्वये सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन परिपत्रकातील सुचना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता देखील लागु राहतील.

४. सदर शासन परिपत्रक संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि संचालक, आयुष संचालनालय यांनी त्यांच्या अखत्यारीतील महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे व सदर परिपत्रकातील सुचनांचे संबंधीत महाविद्यालयांकडुन काटेकोर पालन होईल याबाबत खातरजमा करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०३१५१७३४७६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.05.09 15:48:23 +05'30'

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह/उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व शासकीय/महानगरपालिका / अनुदानित / खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये.
निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-२).